REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# दलित चरित्र आत्मकथन : बदलत्या दिशा

प्रा. डॉ. नामदेव विठ्ठल गवळी
मराठी विभाग, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी,
जिल्हा सिंधुदूर्ग, महाराष्ट्र.

कोणताही लेखक जे जीवनसंदर्भ घेतो, त्यांचे जे अन्वयार्थ लावतो, त्या अनुषंगाने मांडणी करतो, त्यावरून त्या साहित्याचे रंगरूप, प्रकृती निश्चित होते. दलित साहित्याची प्रकृती दलित विषयक जाणिवेने नियत झालेली असल्यामुळे त्याला 'दलित साहित्य' म्हणावयाचे. दलित साहित्यचे उगमस्थान शोधण्याचा प्रयत्न अनेकांकडून होताना दिसतो. काही जण तो उगम बुध्दकाळात शोधतात, काही संतकवी चोखामेळ्यापर्यंत जातात. काहजी क्रांतिवीर फुल्यांपर्यंत पोचतात परंतु यांनी निश्चितच विषम समाज व्यवस्थेविरूध्द बंडाचे निशण रोवले, त्यांची शिकवण, त्यांचे आदर्श हे सतत प्रेरणादयी ठरतील यात शंका नाही. परंतु ऐतिहासिक व वस्तुनिष्ठ पध्दतीने विचार केल्यास दलित सहित्यचे बीज किंवा प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार, त्यांची जीवनदृष्टी व त्या अनुशंगाने केलेल्या चळवळी होय. महाराष्ट्रात दलित समाजात क्रांतिकारी विचारांची परंपरा आणि पिढी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडविली. या क्रांतिकारी जाणिवांचा वाङमयीन आविष्कार म्हणजे दलित साहित्य होय. या संदर्भात शरच्चद्र मुक्तीबोध म्हणतात. "दलित वाङमय' म्हणजे दलितोद्धाराचे वाङमय नव्हे. दलित असणे व दलित जाणिव असणे हे भिन्न आहे. दलित जाणिवेतून दलित जीवनविषयक जे वाङमय निर्माण होते ते दलित वाङमय."[१]

एकोणिसाव्या शतकात भारतात सुरू झालेली महत्त्वपूर्ण सामाजिक चळवळ म्हणजे जाती अंताची व अस्पृश्यता निर्मुलनाची चळवळ, या चळवळीचे फलित म्हणजे विविध साहित्य प्रकारातून फुलून आलेले दलित साहित्य. आतापर्यंतचे मराठी साहित्य हे साडेतिन टक्क्यांचे साहित्य आहे, अशी टिका करत वेशीबाहेरील दलित जीवनाचे चित्रण करणारी आत्मकथने आली आणि यातील दारिद्र्य, यातना, घृणा, संताप यांतुन निर्माण निर्माण झालेल्या दुःखमय जीवनाच्या भेदक चित्रणाने सुखवस्तू पांढरपेशा वर्गाच्या भाव विश्वात चांगलीच खळबळ माजवली. आत्मचरित्र वा आत्मकथन या साहित्यप्रकाराला नवा आयाम देण्याचे श्रेय दलित साहित्यप्रवाहाला आहे. परंपरागत आत्मचरित्रकाराला नवा आयाम देण्याचे श्रेय दलित साहित्यप्रवाहाला आहे. काहींनी तर स्वतःबरोबर स्वसमाजालाही मुक्तीचा मार्ग दाखवला. डॉ. अनिल सूर्या म्हणतात,"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित समाजाची निर्मिती व्हावी, स्वाभिमानासह स्वातंत्र्य-समता-बंधुतेसह एक व्यक्ती दुस-या व्यक्तीशी मिळावी असे स्वकथनकांचे स्वप्न आहे. भेदभाव विरहित आणि जातिविरहीत समाज निर्माण व्हावा, असे परिवर्तन स्वकथनकारांना अपेक्षित आहे."[२] आपली न्याय मागणी मांडण्याचे माध्यम म्हणून दलित लेखक आत्मकथनांकडे वळलेले दिसतात. या संदर्भात शरणकुमार लिंबाळे म्हणतात,"दलित आत्मकथा गुलामीची जशी जाणिव करून देतात, तशी माणसाला त्यच्या माणूसपणाची जाणिव करून देतात. सामाजिक परिवर्तनामधली ही महत्त्वाची कृती आहे."[३] दलित वाङमय ख-य अर्थाने विकसित झाल ते आत्मकथनांच्या अंगाने. या लेखकांनी कथा, कविता, कादंबरी हे वाङमय प्रकारही ब-यापैकी समर्थपणे हाताळलेले आहेत. त्यांची संख्या लक्षणीय असुनही आत्मचरित्र लेखनाइतका त्यांचा या लिखाणाचा गाजावाजा झालेला नाही. मात्र थोड बारकाईन पाहिल तर लक्षात येते की दलित

साहित्यिकांच्या कथात्मक आणि काव्यात्मक लिखाणात देखील आत्मकहाण्या लपलेल्या आहेत. म्हणजे तोही वेगळ्या आकृतिबंधातली आत्मचरित्र आहेत. असे म्हणावे लागते. स्त्रीच्या वाट्याला येणारे दुय्यमत्त्व आणि पितृसत्ता वेगळी असते हे कुमुद पावाडे यांचे (अंतःस्फोट १९८१) मुक्ता सवंगोड यांचे (मिटलेले कवाडे १९८३), शांताबाई कांबळे यांचे (माज्या जलमाची चित्तरकथा १९८६), बेबी कांबळे यांचे (जिणं आमुच १९८७), शांताबाई दांणी यांचे (रात्रंदिन आम्हा १९९०), विमल मोरे यांचे (तिन दगडांची चुल २०००) व उर्मीला पवार यांचे (आयदान २००३) या आत्मचरित्रांनी दलित स्त्रीचे जीवन जातीव्यवस्था, ब्राह्मणी व दलित पितृसत्ता, भांडवलशाही यांच्या हातमिळवणीतुन कसे होरपळलेले असते याचे चित्र केले आहे. या आत्मचरित्रांची समाजशास्त्रीय चिकित्सा डॉ. शर्मिला रेगे व श्यामल गरूड यांनी केली आहे. या आत्मकथनातील आत्मभानाबाबत डॉ.सतिश कामत म्हणतात, "शोषित पिडीत स्त्रियांच्या शक्तीवर विश्वास ठेवून डॉ. आंबेडकरांनी जे कार्य केले त्याची ही परिणीती आहे."[५] त्यांनी दुःखाला न कुरवाळता संकटावर मात करून यश मिळवले आहे. स्त्रीत्व आणि दलिततत्त्वाच्या दुःखावर मात करून या स्त्रियांनी व्यक्तिविकास केलेला आहे. शिक्षणाने आणि आंबेडकरी विचाराने त्यांच्या जीवनात परिवर्तन झले हा परिवर्तनाचा आरसा आहे असे म्हणता येते.

दलित आत्मकथनामधील आक्रस्ताळेपणाबाबत काहींची तक्रार आहे. पण दाहक अनुभवातुन जन्मलेला भावनिक उद्रेक समजुन घेणे गरजेचे आहे. उरबडवेपणा, आक्रस्ताळेपणा हे काही सर्व दलित आत्मकथनात सामाईक लक्षण नाही. आठवणींचे पक्षी मध्ये लेखकाने जे दिसल, जे अनुभवल ते लिहिलं अशा वृत्तीने आपले भयानक व खडतर अनुभव अत्यंत थंडपणे मांडलेत, मी असा घडलो (२००८) या आत्मकथनात भालचंद्र मुणगेकर यांनी वयाच्या अठराव्या वर्षापर्यंतच्या आठवणी सांगितल्या आहेत. त्यानंतरच्या काळात जीवनाच्या विविध क्षेत्रात त्यांचा संबंध आला, महत्त्वाची अधिकारपदे भोगली, पण व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनात जगण्याच्या त्यांचा मुलभुत प्रेरणा अठरा वर्षांतच निर्माण झाल्या हे त्यांनी आवर्जुन मांडले आहे. जाती व अस्पृष्यता निर्मुलन, स्त्री-पुरूष समानता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवाद आणि मानवतावाद या त्या प्रेरणा होय. ही पंचसुत्रे आपल्या जगण्याचे मुलाधार आहेत. जगण्याचे प्रयोजन आहे. असे मुणगेकरांनी म्हटले आहे. याबाबत मीना गोखले म्हणतात, "खरे तर ही मूल्ये हा समाजपरिवर्तनवादी विचार व चळवळी यांचा गाभा आहे हे लक्षात येते."[६] कोकणातील दलित स्त्रीजीवनाचे अनुभवविश्व मराठी साहित्यात "आयदान" ने प्रकट केले. डॉ. आंबेडकरांच्या विचारांमुळे आत्मभान आलेली स्त्री स्वतःच्या उर्जा सिध्द करताना जीवनाशी खंबीरपणे कसा लढा देते, त्यातुनच तिचे स्वतंत्र, प्रगल्भ, परिपक्व, आत्मनिर्भर असे व्यक्तीमत्व कसे घडत जाते, स्वतःच्या जगण्याचा अर्थ शोधण्याची कुवत तिच्या व्यक्तिमत्तात कशी निर्माण होते, हा सारा प्रवास "आयदान" मध्ये येतो. यात स्त्री जिवनाचे दोन प्रवाह आहेत. एक कष्टकरी, खेडूत, प्रवाहपतित दलित स्त्रीचा तर दुसरा महानगरांमध्ये अर्थाजन करून कुटूंब सांभाळणा-या आत्मनिर्भर स्त्रीयांचा. "आमचा बाप आन आम्ही" या आत्मकथनात डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेले कुटूंब पहावयास मिळते. आईवडील, स्वतः नरेंद्र जाधव आणि त्यांच्या कन्या अपूर्वा य तिन पिढ्यांमधील एक महत्त्वाचा परिवर्तनाचा प्रवास आहे. शैक्षणिक्, सामाजिक, जीवनातील प्रवास हा दलित चळवळींशी बांधिलकी असणारा आहे. "जग बदल घालुनी घाव" हे एकनाथ आवाड (शब्दांकन-प्रशांत खुंटे) यांचेही आत्मकथन वैशिष्ट्यपूर्ण आहे. ते म्हणतात, माझ्या आयुष्याच्या दुःख दारिद्र्याबद्दल सांगण्यापेक्षा न्याय मिळविण्यासाठी मी जी पध्दत अंगीकारली त्या पध्दतीला केंद्रस्थानी ठेवून पुस्तक लिहू या. ही आवडीची भूमिका आहे. बापासारखे पोतराज होणे व जातीची पारंपरिक कामे नाकारून आपली वाट शोधली. अस्पृश्यता आणि जातिभेद यांच्या विरोधात गावोगाव संघर्ष मांडला. हजारो भूमिहीनांना गायरान जमिनी मिळवून दिल्या. त्यांना सेंद्रिय शेती शिकवली. व्यवसायाची प्रेरणा दिली. अन्यायावर घाला घालत नवे जग घडवण्याचा पॅटर्न उभा केला. यामागे फुले-आंबेडकरांची प्रेरणा होती. हे आत्मकथन म्हणूनच विलक्षण उर्जा देणारे आहे.

सारांशपणे असे म्हणता येईल की, आंबेडकरी विचारांची मशाल हाती घेऊन दलित समाजाल जागे करण्याचे व परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करण्यचे कार्य या आत्मकथनांनी केले आहे. शिक्षणाने आत्मभान आलेल्या संघर्षमय जीवनाच्या उध्दारकथा आहेत. समाजातील चळवळी, वैचारिक आंदोलने यामुळे बदलत जाणारा समाज यांचेही दर्शन घडवितात. मात्र असे म्हणता येईल की दलित आत्मकथनांतील अनुभव व त्यातुन होणारी अभिव्यक्ती यात तोच तोचपणा येण्याची शक्यता असुन ही आत्मकथने एकसुरी होण्याचा संभव आहेत. नाही म्हटल तरी आजची दलित आत्मकथन ही एका पिढीची आत्मकथन आहेत. सभोवतालचा गुंता वाढत चालला आहे. खाऊजा व संगणकीय

**तंत्रज्ञानाने निर्माण झालेली परिस्थिती, फेसबुक ते ई-बुक, खेड्यांचे शहरीकरण आणि शहरांचे बकालीकरण, प्रगतीची मायावी रुपे, सत्तेचे राजकारण, मराठी भाषेचा प्रश्न यातुन निर्माण झालेले अनेक गुंतागुंतीचे वास्तवातील प्रश्न व आंबेडकरी चळवळीची पुढील दिशा यांतुनच व पुढील आत्मकथनांची समिक्षा करावी लागेल.**

### संदर्भ सूचीः

**१) मुक्तीबोध शरदचंद्र, दलित साहित्य, सिंहगर्जना, जानेवारी-१९७५**
**२) सुर्या अनिल, आंबेडकरी आत्मकथने : एक समाजशास्त्रीय अध्ययन, सुगावा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती-२००८, पृ.२२०**
**३) शरणकुमार लिंबाळे, दलित आत्मकथा एक आकलन, दिलिपराज प्रकाशन, पुणे २००८, पृ.१३४**
**४) कोतापल्ले नागनाथ (डॉ.), साहित्याचा अन्वयार्थ, स्वरूप प्रकाशन-२००८, पृ. ६२**
**५) कामत सतिश (डॉ.), दलित-ग्रामीण साहित्य, निर्मिती संवाद २०१३, पृ.२४**
**६) ललित जून - जुलै २०१३, पृ.९४**